महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक कार्यालय ;**
**यवतमाळ**
एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

Email IDsp.yavatmal@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र. ०७२३२ २५६७०१

जा.क्र. – पोअय/२०२५/ यवतमाळ.
दिनांक - दि. 28/01/2025

## प्रेसनोट

### पोलीस स्टेशन पुसद शहर ने मोटर सायकल चोरट्यांना केले गजाआड

पोलीस स्टेशन पुसद शहर येथे फीर्यादी नामे यादव सुर्यभान खोकले वय 47 वर्ष रा. घाटोडी ता .पुसद जि. यवतमाळ यांनी दि.23/01/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजताचे सुमारास त्यांची मोटर सायकल क्र. MH -29-B.N.-6309 स्प्लेंडर प्लस, विकानेर समोर, सुभाष चौक, पुसद, येथे उभी करुन दाढि-कंटीग करण्याकरीता गेले असता त्यांची मोटर सायकल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली आहे. फीर्यादिच्या अशा रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पुसद शहर येथे अप.क्र. 30 /2025 कलम 303 (2) भा. न्या. सं. अंन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस स्टेशनचे पुसद शहरचे प्रभारी ठाणेदार धिरज बांडे यांनी पुसद शहरातील वाढलेल्या चोरीच्या गुन्हयाचे प्रमाण लक्षात घेउन मोटर सायकल चोरटे यांचा शोध घेने कामी त्वरीत डी. बी. पथकास सुचना देउन गुन्हा उघडकीस आणने करीता आदेशीत केले. त्यावरुन सातत्याने आरोपीचा शोध घेत असताना गोपनिय बातमीदार व सी. सी. फुटेजचे आधारे प्राप्त माहितीचा वापर करुन आरोपी निष्पन्न केले व सापळा रचुन अतिषय कौशल्यपुर्वक आरोपी नामे 1) नरेश शेषराव टारपे वय 40 वर्ष 2) एकनाथ शेषराव टारपे घप 26 वर्ष दोन्ही रा.हर्षी ता.पुसद जि. यवतमाळ यांना ताब्यात घेउन सखोल विचारपुस केली असता पुसद शहरातुन चोरलेल्या मोटर सायकल शेतातील गोठ्यात लपवुन ठेवल्याचे सांगीतले व त्यांचे कडुन वेगवेगळया कंपनीच्या तीन मोटर सायकल किमंत 1,65,000/- रुपयेचा मुदेमाल जप्त करन्यात आल्या आहेत. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्री. कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद श्री.हर्षवर्धन वि.जे. साहेब यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धिरज बांडे यांच्या सुचने प्रमाणे पोउपनि किशोर खंडार, पो.हवा प्रफुल इंगोले, पो.हवा. मनोज कदम, पोकॉ, आकाश बाभुळकर , पोकॉ. शुध्दोधन भगत , चालक पोहवा.अमीत मैदंळकर यांनी केली आहे.

शुभांगी रामभाउजी गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ

Scanned with OKEN Scanner